ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 12 | AUGUST - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

आचार्य दादा धर्माधिकारी यांचे स्त्री–जीवन विषयक विचार

राम नारायण मुडे
संशोधक विद्यार्थी , इतिहास विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रस्तावना :

"माझे जीवन माझा संदेश" असे नम्रपणे सांगणाऱ्या महात्मा गांधी व विनोबांच्या विचारांचे आचार्य दादा धर्माधिकारी भाष्यकार आहेत. गांधी–विनोबांच्या तत्त्वप्रणालीचा प्रसार करणारा एक जेष्ठ प्रवक्ता व तत्त्वचिंतक म्हणून दादा सर्वत्र परिचित आहेत. लोकशाहीचे उपासक दादांनी सदैव आपल्या लिखाणातून व व्याख्यानातून सुस्पष्ट, स्वतंत्र्य, क्रांतिकारी विचार देशाला दिले.

समाजातील जिवंत व प्रचलित प्रश्नविषयी, विशेषत: स्त्री–जीवन विषयक स्वातंत्र्याच्या, समानतेच्या तत्त्वजिज्ञासेच्या दृष्टीने विचार मंथन करून आपले निष्कर्ष नम्रपणे सहजतेने समाजासमोर सादर केलेत.

दादांच्या मनात लहानपणापासूनच स्त्रियांबद्दल एक विशेष सहानुभूती व आदरपूर्ण आस्था निर्माण झालेली होती. कुटुंबात व समाजात स्त्रियांना देण्यात येणारी निम्म व गौण, अपमानास्पद स्वरूपाची वागणूक दादांना कधीही सहन होत नसे. तेव्हा पासूनच दादांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर म्हणा की, तिच्या सामाजिक दर्जाबद्दल विचार मंथन सुरू केले.

पिढी दर पिढी समाजात सतत चालत आलेल्या स्त्रियांच्या प्रश्नावर विचार करण्याची मुभा कधीच पुरूषप्रधान संस्कृतीच्या समाजाने दाखविलेली नाही. मूळात त्या स्वरूपाची समाजाची मानसिक तयारी नव्हती असेच दादांना वाटत. त्या काळात दादांनी स्त्री–जीवन विषयक विचार समाजासमोर मांडून स्त्रियांच्या उन्नतीचा विचार केला आणि समाजाला विचार करण्यास भाग पाडले.

स्त्रियांच्या बाबतीत दादांची वागणूक नेहमीच एक वात्सल्य पित्याप्रमाणे राहिली. कारण तिचे दु:ख, अडचणी तिचे समाजात–घरात स्थान व दर्जा काय? यांची संपूर्ण जाणीव दादांना होती. म्हणूनच ते म्हणत 'स्त्री ही एकटी नाही, ती कुणाची तरी मुलगी, पत्नी, बहीण, आई कुठल्या ना कुठल्या नात्याने समाजाला तिची ओळख आहे. ती एक स्वतंत्र्य माणूस म्हणून ओळखल्या जात नाही. पुरूषाप्रमाणे तिलाही अधिकार आणि स्थान आहेत. याची तिला जाण नाही. म्हणूनच त्याचा उपयोग ती करत नाही. आजही ती कुटुंबात गुंतून आहे. पण कौंटुबिकता जर समाजव्यापी झाली तर सामाजिक व्यवहारात तिचे स्वातंत्र्य सार्थ होऊ शकेल.' हा विचार दादांनी मांडला.

जर तिला खरोखरच स्वतंत्र्य व्हायचे असेल तर प्रथमत: स्त्री–पुरूष संबंधाचा विचार करावा लागेल. हे करतांना ती मानवीय व्यक्ती आहे. या नात्याने विचार केला तर आज जे काही अनेकांशी तिचे या ना त्या प्रकारचे नाते जोडले जाते. त्यातून तिची सुटका होईल. आज ती कुण्याच्या तरी भरवश्यावर राहत आहे. पण तिचे सहजीवन व्हायला हवे म्हणजे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्ती बरोबर जगेल. ह्यामुळे ती दुसऱ्यावर निर्भर राहणार नाही तर 'सहयोगी' असेल, आश्रित असणार नाहीत. म्हणजेच ती आत्मनिर्भरता ठरेल.

खरे पाहिले तर सहजीवनाचा नियम स्त्री व पुरूष या दोघांनाही लावायला हवा. आपले अधिकार, आपले स्वातंत्र्य मिळविणे हे स्त्रियांच्याच हाती आहे. तिच्या हांती शस्त्र नसेल पण चित्तात शांती असू शकते. आपले स्वातंत्र्य आपल्यालाच मिळवायला हवे हे

लक्षात आले म्हणूनच तर स्त्री–मुक्ती, स्त्री–शक्ती जागरण समाजात सुरू झाले. अशा वेळी दादांना ते उल्लेखनीय व गौरवास्पद वाटते.

१९६० मधील शांती सैनिक विद्यालय, काशी येथे झालेल्या 'स्त्री–पुरूष सहजीवन' वरील व्याख्यानातून दादा स्त्रीचा मूलभूत प्रश्न अचूकपणे मांडतात. दादा वारंवार सांगतात की, मी फक्त प्रश्न मांडतो, उत्तर मला गवसले (सापडले) असा दावा करत नाही. पण तरीही त्यांनी स्त्रियांच्या समस्यांची सोडवणूक ज्यांच्या आधारे करता येईल असा मार्ग दाखविला आहे. आकाराने छोटयाशा परंतु मोठमोठया ग्रंथाना जन्म देण्याचे सामर्थ्य असलेल्या त्या व्याख्यानाचा विषय आहे, स्त्री–स्वातंत्र्य, स्त्री–पुरूष सहजीवन, स्त्री–पुरूष समानता, स्त्री–शिक्षणात क्रांती.

अस्पृश्यता वेदविदित जरी ठरली तरी ती मान्य करता येत नाही. त्याचप्रमाणे स्त्री–जीवनाचे गौणत्त्व परंपरागत नीती–विचार, सामाजिक संकेत व सांस्कृतिक धारणा यांनी मान्य केलेले असले, तरी ते स्वीकारता येणे शक्यच नाही. हे स्पष्टपणे मांडतांना दादांनी धर्मवचने, पुराणमत्त्वादी शास्त्रे व जीर्णमत्त्वादी शास्त्री पंडितावर कडाडून हल्ला केला आहे. याच मालिकेतील विचार ठेवणारे विज्ञानशास्त्र व फ्राईडचे मनोविश्लेषण देखील दादांच्या समीक्षेतून सुटत नाही. ज्या तत्त्वज्ञानाप्रमाणे स्त्री व पुरूष यांच्यात नर व मादी यांच्याखेरीज दुसरे कुठलेच नाते राहू शकत नाही. ते तत्त्वज्ञान अत्यंत अनार्थवह व भयावह आहे, असे दादा ठामपणे म्हणतात.

स्त्री–दास्याचे मूळ हे तिच्या शरीरनिष्ठ रचनेवर आधारित आहे. त्यामुळे स्त्री–पुरूषाच्या नैसर्गिक संबधांत शारीरिकता प्रमुख असते. एकाचे शरीर हे दुसऱ्याचे उपभोग्य वस्तू मानून त्याचे शोषण केले जाते. यात स्त्रीच्या वाटयाला येणारे शोषण अत्यंत घृणास्पद व गंभीर स्वरूपाचे आहेत. कारण यात माणूस मानसाचे साधन बनविल्या जातो. व्यक्ती वा माणूस म्हणून स्त्रीचे जीवनच संपृष्टात येते. पुरूषाने स्त्री–देहाला विषय मानले व स्त्रीनेही स्वत:चा देह विषय मानला. यातूनच ती रक्षणाकांक्षिणी बनली. म्हणूनच ती आक्रमण सुलभ झाली. ती देहनिष्ठ बनली. रूपधन, शरीरधन बनली. जेव्हा एखादया वस्तूला आपण विषय मानतो, तेव्हा दोनच पर्याय असतात. एक निर्बंध व दुसरा मोकळीक. पहिल्या पर्यायाचे पर्यवसान स्त्रीच्या चारित्र्यात पावित्र्यापेक्षा पुरूषनिष्ठेला व पात्त्रित्याला अधिक महत्त्व देण्यात झाले. असे दादा म्हणतात, स्त्रीचे शिल तिच्या इतर गुणापेक्षा शरीरपावित्र्यावर ठरविले जाऊ लागले व स्त्री ही देहपरायण व पतिपरायण बनली. आपली आब्रु आपण सांभाळू शकत नाही, हे जेव्हा तिच्या लक्षात आले तेव्हा विवश होऊन तिने आत्मरक्षणासाठी पुरूषाचा आधार घेतला. पात्त्रित्य सुरक्षित ठेवण्यासाठी स्त्रीने आत्मसमर्पण केले. दादाच्या मते आत्मसर्मपनाची शक्ती असलेली स्त्री आत्मरक्षणाचा प्रयत्न न करता आल्यामुळे ज्याचे रक्षण करायचे ते धन (शील) ज्याच्यापासून रक्षण करायचे त्याच्याच हवाली करते. हेच स्त्रीचे मुख्य कोडे आहे. याच कारणास्त्व स्त्री–सदैव पुरूषस्पर्शाला व पुरूष संपर्काला घाबरते. या भितीमुळे खरेखुरे स्त्री–पुरूष सहजीवन अशक्य आहे.

याच संदर्भात दादा स्त्रियांमध्ये अभावानेच आढणाऱ्या सख्य भावनेचाही उल्लेख करतात. अधिकांश स्त्रियां स्वत:चेच नव्हे, तर इतर स्त्रियांचेही शरीर अपवित्र मानतात. पुरूषांचे शरीरश्रेष्ठत्त्व मान्य करतात. याच कारणास्त्व पुरूष पुरूषासाठी करतात तसा त्याग एक स्त्री दुसऱ्या स्त्रीसाठी करायला तयार नसते. स्त्रियांच्या संख्यामध्ये या उनिवेमुळेच जिवंतपणा नसतो. परस्पर भगिनीसंबंध फार कमी. सवतीमत्सराचे प्रमाण जास्त. पुरूषांचा असलेला संबंध भीतीचा, संशयाचा व संकोचाचा त्यामुळे स्त्रियांचे सहजीवन स्वायत्त नसते. ते कुटुंबापुरतेच असते. स्त्रीच्या जीवनात प्राधान्य मैत्रीला नसून नात्याला आहे. हे नाते रक्तसंबंधावर आधारित म्हणजे शरीरनिष्ठ असतात. एकूण काय तर स्त्रीचे कौटुंबिक व सामाजिक जीवन शरीर या नैसर्गिक देणगीने मर्यादीत व साचेबंद करून टाकले आहे.

स्त्री–पुरूषात कामवासना व कौटुंबिक नाते या व्यतिरिक्त वेगळा स्नेहबंध असू शकतो की नाही व असेल तर तो कसा असावा या प्रश्नांच्या दिशेने दादांनी चितंन केलेले दिसते. दादांनी आपल्या विवेचनात स्त्री–पुरूष सहजीवन कल्पना विशद केलेली आहे. हे सहजीवन म्हणजे कुटुंबबाहय सहजीवन होय. कुटुंबात नैसर्गिक संबंध प्रमाणभूत मानले जातील, तर समाजात संस्कार व सांस्कृतिक संबंध आधारभूत बनतील. यासाठी स्त्री–जीवनाला प्रथम एक शुभ–संकल्प करावा लागेल. तो म्हणजे स्वत:च्या शरीराला विषय मानने थांबविणे असा संकल्प केलेली स्त्री 'स्वरक्षित' होऊ शकेल काय? समाज या प्रश्नाचे उत्तर देतांना म्हणतो, 'ती सुरक्षित होऊ शकेल पण स्वरक्षित कदापिही होणार नाही.' समाजवाद, साम्यवाद, विज्ञानवाद व धर्म या प्रश्नांचे उत्तर देऊ शकत नाही. पण दादांच्या मते आध्यात्म या प्रश्नांचे उत्तर देऊ शकते. स्त्री ज्यादिवशी जीवनात ब्रह्मचर्याला प्रतिष्ठा देईल, त्या दिवसापासून ती देहस्विनी बनणे सोडून देईल. तिचे रूप भाग्य ठरणार नाही. हे ब्रह्मचर्य म्हणजे व्यक्तिनिष्ठ ब्रह्मचर्य नव्हे. इंद्रियदमन करणारे ब्रह्मचर्य समाज व व्यक्तिसाठी अनावश्यक, नुकसानकारक असते. स्त्री–पुरूष सहजीवनात जेव्हा संयमापेक्षा प्रेमावर अधिक भर दिला जातो. ज्यात काम गौण व प्रेम मुख्य असते. तेव्हा शारीरिकता कमी होत जाते व तिथून सहजीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो.

दादांच्या शब्दात सांगायचे झाल्यास 'स्त्री–पुरूषाच्या जीवनात विषमतेचे मूळ काम हेच आहे. म्हणून कामनिरपेक्ष स्नेहसंबंध हाच ती विषमता दूर करण्याचा उपाय आहे. यालाच दादा सामाजिक जीवनातील ब्रह्मचर्याची भावना मानतात.

विवेचनाच्या पुढच्या टप्प्यात दादांनी कौटुंबिक समाजाची कल्पना मांडली आहे. कुटुंबात एक पती–पत्नीचे नाते सोडले तर इतर नाती प्रेमावर आधारलेली असतात. कौटुंबिक समाजात, कुटुंबसंख्येत प्रेमाच्या तत्त्वाचा स्वीकार करायचा पण त्याचा मूलाधाराचा म्हणजेच कामप्रेरणेचा अस्विकार करायचा. ही कामप्रेरणा सार्वत्रिक बनवायची नाही. पतिपत्नीचे नाते व भावना केवळ कुटुंबापुरतीच मर्यादित ठेवून मातृत्त्व, पितृत्त्व, भातृत्त्व, भगिनित्त्व या जन्ममूलक पण स्नेह प्रचूर नात्यांचा स्वीकार करायचा. कारण या नाते संबंधात वासना नाही व भयही नाही. अशा कुटुंबात व्यक्ती सहज प्रेरणेने परस्परांच्या सुख व आनंदासाठी आपल्या पात्रतेप्रमाणे झटेल. सहजीवनाचे अधिष्ठान अशा कौटुंबिक समाजाची निर्मिती हे आहे. पतित्त्वनिरपेक्ष पितृत्त्व व पत्नित्त्वनिरपेक्ष मातृत्त्व या सामाजिक मूल्यांच्या प्रतिष्ठापनेची गरज अशा समाजाच्या वाढीला पोषक ठरते. मनुष्याची बुद्धिमत्ता त्याच्या जीवनातील श्रेष्ठतम वरदान आहे.

स्त्रीच्या मातृत्त्वाचा गौरव करतांना दादांनी मातृत्त्व हे संस्कृतीचे प्रतिक व स्त्री जीवनाचा प्रसाद आहे असे म्हटले आहे. पण त्याचबरोबर मातृत्त्व अनिवार्य मानल्या गेल्यामुळे स्त्री ही पुरूषपरायण बनली, हे देखील सांगायला दादा विसरले नाही.

दादांच्या मते स्त्री–पुरूष समानता म्हणजे सारखेपणा किंवा बरोबरी नव्हे. स्त्रीने पुरूषाची व पुरूषाने स्त्रीची जागा घेणे नव्हे, तर स्त्री व पुरूष समबळ व समतुल्य ठरणे होय. हा मूल्यपरिवर्तनाचा प्रश्न आहे. त्यासाठी स्त्रियांनी काही काळ नैतिकतेचा आधार घेणे आवश्यक आहे. आत्मबल व मनोबलाचा प्रयोग करून जुन्या संस्काराची पाळेमुळे खोदुन काढून नव्या संस्काराचे बिजारोपन स्त्रियानांच करावे लागेल. समाजात प्रतिष्ठा मिळविणे ही जीवनाची अंतिम आघाडी आहे.

शांती सैनिक विद्यालय, काशी येथील व्याख्यानाच्या सुरवातीलाच दादा म्हणतात, 'माझ्या दृष्टीने स्त्री–शिक्षण एक जिव्हाळयाचा प्रश्न होऊन बसला आहे. वास्तविक मी तात्त्विक दृष्टीने विचार करणारा माणूस, पण या व्यावहारिक प्रश्नाचाही विचार करणे मला भाग पडले आहे. स्वत: शिक्षण क्षेत्रात काम केलेले नाही. त्यामुळे आपला यावर काही बोलण्याचा अधिकार अल्प स्वरूपाचा आहे. हे ही ते मान्य करतात. स्त्री–शिक्षणावर बोलणे अगर लिहणे सोपे नाही. हेही मान्य असूनही तरी ह्या प्रश्नावर बोलले पाहिजे. असे आपल्याला का वाटले याचे उत्तर देतांना दादा म्हणतात की, 'अहिंसक समाजाच्या स्थापनेसाठी समाजात शांती नांदावी यासाठी स्त्री–शिक्षण हेच प्रभावी साधन होय. अहिंसा म्हणजे बंधुभाव अशी अहिंसेची साधी सरळ व्याख्या करून लष्करी सत्तेची प्रतिष्ठा नष्ट करण्यासाठी स्त्री–शिक्षणावाचून गत्यंतर नाही' असे निदान दादा करतात.

दादा जेव्हा स्त्री–शिक्षणावर विचार करीत होते. त्यावेळी प्रत्यक्ष त्यांच्या कुटुंबात आणि सभोवतालच्या समाजातही सनातनी धर्माचे भयानक वर्चस्व होते. सनातन धर्माचे भयंकर रूप त्यांनी पाहिले. या सनातन धर्माच्याच नवीन आवृत्या निघत असतात. फॅसिझम हे याच सनातन धर्माचे आधुनिक संस्करण होय. केवळ शरीराच्या घडणीमुळे स्त्रीने सतत स्त्रीच राहिले पाहिजे व पुरूषानेही नेहमी पुरूषच राहिलं पाहिजे असे फॅसिझम मानतो. हिटलरने स्त्रियांना दिलेला 'बॅक टू पॉट्स ॲन्ड पॅन्स' हा आदेश आणि मनुस्मृतीचा 'अस्वतंत्रा: स्त्रिय: कार्या:' हा आदेश यातील लक्षणीय सारखेपणा दादाच्या नजरेने टिपला आहे. याच विचारसरणीने स्त्रीला नरकाचे मूळ मानले. स्त्री विषयक असा समज हा ज्या नितिमत्तेचा आधार असेल ती नितिमत्ता खोटी आहे. बनावटी आहे असे स्पष्ट मत दादा मांडतात. दादा समोर म्हणतात की, स्त्री–शिक्षणासंबंधी विचार करतांना आम्हाला आमच्या सामाजिक कल्पना बदलाव्या लागतील. म्हणजेच स्त्री–विषयक कलुषित आणि विकृत विचार एकीकडे जोपासत स्त्री शिक्षणाचा विचार घेऊच शकत नाही.' हा पहिला महत्त्वाचा सिद्धांत दादा सांगतात.

तसेच दादांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या मतावर मार्मिक टिप्पणी केली आहे. डॉ. राधाकृष्णन यांनी असे मत मांडले की, 'सर्व जन इक्वालिटीसाठी भांडतात परंतु क्वालिटीची कुणालाच पर्वा नाही.' स्त्रियांना उद्देशून राधाकृष्णन यांचे मत हे लक्षात घेऊन दादा म्हणतात की, क्वालिटी म्हणजे गुणविकास हे शिक्षणाचे साध्य आहे. तेव्हा शिक्षणाच्या दृष्टीने स्त्री व पुरूष यांच्यात कसलीही विषमता असू नये, ते समान भूमिकेवर असावयास हवे. कुणी उत्कृष्ट नाही, कुणी नित्कृष्ठ नाही. आजची स्थिती दुर्दैवाने तशी नाही.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्त्री–जीवनाची प्रचलित मूल्ये बदलण्यावरच दादांनी भर दिला. मूल्ये बदलण्यासाठी प्रथम मानसिक क्रांती आवश्यक आहे आणि मानसिक क्रांतिचे किंवा परिवर्तनाचे माध्यम नुसते शिक्षण नव्हे तर समक्य शिक्षण होय. असे प्रतिपादन दादा करतात. मग समक्य शिक्षण म्हणजे दादांच्या मतानुसार कसे स्त्री शिक्षण? तर स्त्रीच्या मनाला ज्या शिक्षणातून वळण मिळेल तेच खरेखुरे समक्य स्त्री शिक्षण होय.

आधुनिक स्त्रीशिक्षणाचा विचार अधिक व्यापक व्हावा यासाठी स्त्री–पुरूष शिक्षणाला समान तीन मुद्दे दादा शिक्षण शास्त्रानुसार सांगतात. ते पुढील प्रमाणे....

१) सामंजस्य
२) अनुबंध
३) विनय

शिक्षणातील निरनिराळया विषयांचा परस्पर संबंध म्हणजे सामंजस्य आणि एकंदर शिक्षणाचा जीवनाशी संबंध म्हणजे अनुबंध होय. शिक्षणात ही दोन तत्त्वे आल्याने ते जीवनोपयोगी होते. जीवनाच्या सर्वच सेवांशी संबंध प्रस्थापित झाला पाहिजे. सामाजिक परिस्थिती व प्रगती यांच्याशी शिक्षणाच्या आणि अर्थातच स्त्री–शिक्षणाचाही प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे.

अशा रीतीने सामंजस्य व अनुबंध याखेरीज शिक्षणाचे तिसरेही तत्त्व दादा सांगतात, ते म्हणजे विनय. विनय म्हणजे संस्कृती, म्हणजेच सदृभिरूची. 'विद्या विनयेन शोभते' सारखी वचने हेच दाखवितात की नुसत्या विद्येत विनयहीन विद्येत समतोल राहत नाही. तेव्हा स्त्री–शिक्षणासाठी 'विनय' हा महत्त्वाचा निकष आहे, असे दादा म्हणतात. या शब्दाचा अतिशय सोपा अर्थ उलगडून दाखवितात आणि तो म्हणजे सामाजिकता. सामाजिकता म्हणजे इतरांसोबत वागण्याची कला जीवनाच्या प्रत्येक व्यवहारात स्त्री–पुरूषांना ऐकमेकांशी वागण्याची कला साधली पाहिजे. स्त्रीने पुरूषनिष्ठ राहून स्त्री–पुरूषाचे सहजीवन साध्य होणार नाही. निष्ठा स्त्रीला पुरूषनिर्भर बनविते. स्त्रिया स्वभावातील किंवा जीवनातील हा मुख्य दोष होय आणि हा पुरूषनिर्भरतेचा दोष शिक्षणाने दूर केला पाहिजे अशी अपेक्षा दादा प्रचलित स्त्री–शिक्षणाकडून करतात. स्त्री–शिक्षणाच्या माध्यमातून हे जर घडले नाही तर शिकुनही स्त्री खऱ्या अर्थाने कधीच शिक्षित होणार नाही. तिचे शिक्षण आणि तिचे नागरिकत्त्व या दोन्ही गोष्टी म्हणजे केवळ तिचे शोभेचे अलंकारच ठरतील.

अहिंसा आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीशिक्षण असे म्हणण्यासाठी कोणता संकेत आहे. ते आपल्याला दादाच्या विचारपध्दतीनुसार त्यांच्याच विवेचनात आढळतात.

दादांच्या अभिप्रेत असलेल्या आदर्श स्त्री शिक्षण प्रणालीने समजा अपेक्षीत परिणाम स्त्रियांवर केला तर कोणते चित्र आपल्याला समाजात निर्माण झालेले आढळेल? स्त्रीची पुरूषनिर्भरता पुरूषापासून रक्षणाची आकांक्षा संपेल. शिक्षणाने स्त्रीच्या मानसिकतेत परिवर्तन झाले तर, तिच्या ठिकाणी निष्ठे ऐवजी निर्भयता येईल. भीती गेल्यामुळे ती पुरूषावर समानतेच्या नात्याने प्रेम करू शकेल. प्रेम आणि मैत्री ही मूल्ये स्वीकारल्याने स्त्रीवरील अत्याचारांचे किंवा तिच्या गुलामीचे मूळ कारण म्हणजे तिची पुरूषावलंबिताच संपून जाईल. परिणामी कुटुंबात आणि समाजात शांतता प्रस्थापित होईल आणि त्यातून अहिंसक समाजाची नव्याने निर्मिती होण्याची वाट दिसू लागेल. ही प्रक्रिया सुरू होण्यासाठी नव्या मूल्यांवर आधारित शिक्षण स्त्रीला मिळाले पाहिजे. त्याखेरीज 'शिक्षणातून क्रांती' या समाजात प्रत्यक्षात उतरणार नाही. असा दादांचा स्त्री–शिक्षणासंबंधी क्रांतिकारक विचार आहे.

संदर्भ :–

१) धर्माधिकारी दादा, "समग्र सर्वोदय दर्शन" खंड–१, सर्व सेवा संघ प्रकाशन राजघाट, वाराणसी – २००२
२) धर्माधिकारी दादा, "समग्र सर्वोदय दर्शन" खंड–२, सर्व सेवा संघ प्रकाशन राजघाट, वाराणसी – २००२
३) धर्माधिकारी दादा, "आशा उद्याची" चेतश्री प्रकाशन देशमुख चाळ, अमळनेर, तिसरी आवृत्ती – १ जानेवारी १९८९
४) धर्माधिकारी दादा, "नये युग की नारी", सर्व सेवा संघ प्रकाशन राजघाट, वाराणसी – १९९८
५) धर्माधिकारी दादा, "स्त्री पुरूष सहजीवन" परधाम प्रकाशन, पवनार (वर्धा) जुलै २००८
६) धर्माधिकारी दादा, "तरूणाई" मंजुल प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, तिसरी आवृत्ती २०१३
७) धर्माधिकारी तारा (संपादक), "दादा धर्माधिकारी जीवन दर्शन" देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., १८ जून १९९९,
८) धर्माधिकारी तारा, "महाराष्ट्राचे शिल्पकार आचार्य दादा धर्माधिकारी", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई – २००२
९) शास्त्री रामप्रवेश (संपा), "सत्यनिष्ठ विचारयोगी" सर्व सेवा संघ प्रकाशन राजघाट, वाराणसी, जून २००७
१०) "गांधी मार्ग मीमांसा" विशेषांक म. गांधी लोकसेवा संघ, सदाशिव पेठ पुणे, जून १९९८